# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


**प्रेस नोट क्र-१३७** **दिनांक - ०८/०४/२०२४**

## ०३ वर्षापुर्वी प्रियकराच्या प्रेमसंबधात अडथळा ठरणाऱ्या पतीची हत्या केलेल्या खुनाचा उलगडा करण्यात पेल्हार पोलीस ठाणेचे गुन्हे प्रकटीकरण पथकास यश.

पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत दिनांक ०३/०४/२०२४ रोजी रोजी दोन इसम त्यांच्या ताब्यात धारधार शस्त्र बाळगुन दखलपात्र गुन्हा करण्याच्या उद्देशाने धानिवबाग बजरंग चाळ, नालासोपारा पुर्व येथे येणार असल्याबाबत गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि/सोपान पाटील यांना खात्रीशीर माहिती प्राप्त झाली. सदरची माहिती सपोनि/सोपान पाटील यांनी पेल्हार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. जितेंद्र वनकोटी सो, यांना दिली असता त्यांनी बातमीची सत्यता पडताळुन कायदेशिर कारवाई करणेबाबत आदेश दिले. सदर आदेशान्वये गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि/सोपान पाटील, पोउपनिरी/तुकाराम भोपळे व पोलीस पथकाने सदर ठिकाणी सापळा रचुन १) पोखन परण साव, वय ५० वर्षे, व्यवसाय रिक्षा चालक, रा. नालासोपारा पुर्व ता. वसई जि. पालघर, २) अब्दुल मुबारकअली शाह ऊर्फ बड्डा, वय २३ वर्षे व्यवसाय चालक, रा. नालासोपारा पुर्व ता. वसई जि. पालघर यांना ताब्यात घेऊन त्यांची पंचा समक्ष झडती घेतली असता त्यांच्या ताब्यात एक ॲटो रिक्षा, एक तलवार, एक सुरा, असे धारदार हत्यारे व एक मोबाईल फोन मिळुन आल्याने ते जप्त करण्यात आले आहे. सदर बाबत त्यांचे विरुध्द पेल्हार पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. ३७७/२०२४ भारतीय हत्यार कायदा कलम ४, २५ सह म. पो. कायदा कलम ३७(१), (३) १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्हयाचा तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. जितेंद्र वनकोटी यांनी गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि सोपान पाटील यांना करणेबाबत आदेशित केले होते. सदर गुन्हयाचे तपासादरम्यान सपोनि/सोपान पाटील यांना त्यांचे गुप्तबातमीदार यांच्याकडुन वरील गुन्हयात अटक आरोपीत यांनी ३ वर्षापुर्वी एका इसमाचा खुन केला असल्याबाबत माहिती मिळाली. त्या अनुषंगाने सपोनि सोपान पाटील, पोउपनिरी/तुकाराम भोपळे व पोलीस पथकाने अटक आरोपीत यांच्याकडे कौशल्यपुर्वक तपास केला. त्यामध्ये अटक आरोपीत पोखन परण साव वय - ५० वर्षे, याने त्याचे नायगाव येथे राहणा-या एका महिले सोबत प्रेमसंबध होते. सदर प्रेम संबधामध्ये सदर महिलेचा पती वकील अहमद बादशाह अहमद इद्रीसी हा अडसर ठरत असल्याने अटक आरोपीत पोखन साव याने त्याचे साथीदार अब्दुल मुबारकअली शाह ऊर्फ बड्डा, व इम्रान इब्राहिम सिध्दीकी यांचे सह मिळुन कट रचुन वकील अहमद यांस दिनांक ०३/०९/२०२१ रोजी रात्रौ २०:३० वाजताचे सुमारास श्री.राधा कृष्ण हॉटेल चे जवळ, मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग क्र.०८ चे कडेला बाफाने गावच्या हद्दीत ता. वसई जि. पालघर येथुन जबरदस्तीने जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने ॲटो रिक्षा क्र.एम एच ४७ एक्स १९२८ हिच्यामध्ये बसवुन त्यास शिवीगाळी दमदाटी करुन त्याचा गळा आवळुन त्याच्या मानेत डिओ दुचाकीची चावी भोकसुन जिवे ठार मारुन त्याचा खुन करुन त्याचा मृतदेह मौजे भालीवली गावचे हद्दीत मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग क्र. ०८ चे गुजरात वाहिनीलगत खड्डयात फेकुन दिला असल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले. आरोपीत याने मयत यास जबरदस्तीने रिक्षात बसविलेली जागा व मृतदेह फेकुन दिल्याची जागा दाखवली असता पेल्हार पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाने सदरची माहिती मा. जितेंद्र वनकोटी सो, यांना दिली. त्यांनी सदरबाबत सखोल तपास करण्याचे आदेश दिले. त्या अनुषंगाने वकील अहमद यास फेकुन दिलेल्या ठिकाणाबाबत माहिती घेतली असता विरार पोलीस ठाणे येथे एक अनोळखी इसमाचा मृतदेह दिनांक ०६/०९/२०२१ रोजी कुजलेल्या स्थितीत मिळुन आल्याबाबत विरार पोलीस ठाणे अकस्मात मृत्यु रजि. क्र. १८७/२०२१ सीआरपीसी १७४ प्रमाणे दाखल असल्याचे निष्पन्न झाले. तसेच सदर इसम वकील अहमद ही व्यक्ती हरवले बाबत वालीव

पोलीस ठाणे मनुष्य मिसिंग रजि. नं. २४७/२०२१ दाखल आहे. सदर आरोपीत पोखन साव याचेकडे आणखी तपास केला असता त्याने सदर महिलेचा दुसरा प्रियकर विक्रम गुप्ता यांस सुध्दा जिवेठार मारण्याचा कट रचला होता. परंतु तो पुर्ण होवु शकला नसल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. सदर बाबत **विरार पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. २८१/२०२४ भा. दं. वि. स. कलम ३०२, ३६४, २०१, ५०४, ५०६, ३४ प्रमाणे** गुन्हा दाखल आहे. सदर गुन्हयातील तीनही आरोपीत यांना पेल्हार पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण शाखेने ताब्यात घेतले आहे.

सदरची कामगिरी मा. पोलीस आयुक्त श्री. मधुकर पाण्डेय, अपर पोलीस आयुक्त श्री. श्रीकांत पाठक, मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय, श्री. जयंत बजबळे, पोलीस उप आयुक्त सो, परिमंडळ - ३, विरार, श्री. बजरंग देसाई, सहायक पोलीस आयुक्त सो, विरार यांचे मार्गदर्शनाखाली श्री. जितेंद्र वनकोटी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो, श्री. कुमारगौरव धादवड, पोलीस निरीक्षक (गुन्हे), श्री. शकील शेख, पोलीस निरीक्षक (प्रशासन) व गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि सोपान पाटील, पोउपनिरी/तुकाराम भोपळे, पो.हवा/योगेश देशमुख, तानाजी चव्हाण, अनिल शेगर, वाल्मीक पाटील, पो.अं/मिथुन मोहिते, रवि वानखेडे, संजय मासाळ, किरण आव्हाड, राहुल कर्पे, निखील मंडलिक, दिलदार शेख, अनिल साबळे, शरद राठोड, सुजय पाटील, सर्व नेम पेल्हार पोलीस ठाणे, पोहवा/ नामदेव ढोणे, पो.अं. सोहेल शेख नेम. पोलीस उप आयुक्त कार्यालय परिमंडळ ०३, यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

